दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०८/२०२६
कश्यप वि. कोणी नाही.
नि. १० लगत

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.१**

**कश्यप सचिन साकुळकर तर्फे अज्ञान पालनकर्ता संगिता दत्ताराम नाईक**

**शपथेवर सुरु**

**पुढील सरतपास अर्जदारतर्फे विधिज्ञ श्रीमती अे. अे. बांदेकर यांचेतर्फे**

९. सदर अर्जात मी माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर अर्जाकामी मी खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

१. मी माझे पती सचिन वसंत साकुळकर यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. ११** देण्यात येत आहे.

२. दिनांक १३/११/२०२५ रोजी उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग (जि. प.) सावंतवाडी यांनी मला दिलेल्या पत्राची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १२** देण्यात येत आहे.

३. मी माझा मुलगा कश्यप सचिन साकुळकर याचे आधारकार्डची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १३** देण्यात येत आहे.

४. मी माझे आधारकार्डची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १४** देण्यात येत आहे.

५. मी माझे रेशनकार्डची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १५** देण्यात येत आहे.

६. दिनांक २१/०१/२०२६ रोजी दैनिक 'सकाळ' सिंधुदुर्ग आवृत्ती या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली जाहिर नोटीस अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १६** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.03.11 16:37:27 +0530

दिनांक –११/०३/२०२६

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.